Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

Original Article

# बागलाणातील ऐतिहासिक सारावाढविरोधी जनआंदोलन

**प्रा. डॉ. संदीप भामरे**
इतिहास विभाग के.टी.एच. एम. महाविद्यालय, नाशिक
**Email-sandibhamare1980@gmail.com**

**Manuscript ID:**
JRD -2026-180511
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 5(A)
Pp. 45-48
May- 2026
**Submitted:** 15 Apr. 2026
**Revised:** 25 Apr. 2026
**Accepted:** 10 May. 2026
**Published:** 31 May 2026

***सारांश :***

*"बागलाणातील ऐतिहासिक सारावाढविरोधी जनआंदोलन" हा लेख बागलाण प्रदेशातील ब्रिटिशकालीन शेतकरी चळवळीचा ऐतिहासिक आढावा घेतो. ब्रिटिश सरकारने महसुलात (साऱ्यात) केलेल्या वाढीविरोधात बागलाणातील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक यांनी व्यापक जनआंदोलन उभारले. या आंदोलनासाठी विविध गावांमध्ये सभा घेऊन लोकजागृती करण्यात आली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रेरणेने या चळवळीला अधिक बळ मिळाले आणि १९२९ मध्ये बागलाण शेतकरी संघाची स्थापना करण्यात आली. या आंदोलनात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी सक्रिय सहभाग घेतला व त्याग केला. बागलाणातील सारावाढविरोधी चळवळ ही केवळ आर्थिक अन्यायाविरुद्धची लढाई नसून स्वातंत्र्य चळवळीला दिशा देणारे प्रभावी जनआंदोलन ठरले. त्यामुळे बागलाणला 'बार्डोली'ची उपमा प्राप्त झाली आणि या प्रदेशाच्या राजकीय व सामाजिक जागृतीत या आंदोलनाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले.*

***मुख्यशब्द:*** *बागलाण, सारावाढविरोधी आंदोलन, शेतकरी चळवळ, स्वातंत्र्य चळवळ, सरदार वल्लभभाई पटेल, बागलाण शेतकरी संघ, ब्रिटिश राजवट, जनआंदोलन, स्वातंत्र्यसैनिक, लोकजागृती.*

## प्रास्ताविक –

नाशिक जिल्हयातील बागलाण या प्रदेशाला ऐतिहासिक वारसा लाभलेला दिसून येतो.आजमितीला नाशिक जिल्ह्यातील तो एक भाग आहे. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांना जोडणारा सेतू म्हणजे बागलाणचा प्रदेश म्हणून महत्वाची ओळख या प्रदेशाची होय . बागलाण या भूपदेशाला त्याचा स्वतंत्र असा इतिहास आहे. 'बागलाण' या प्रदेशात्मक संज्ञेत जो विचारप्रवाह व संशोधनदृष्टीकोण प्रचलित आहे. त्यान्वय बागलाण या प्रदेशात 'बागुल' या राजवंशाची प्रदीर्घकाळ सत्ता होती. या बागूल राजवटीचे राज्य म्हणून त्यांच्या नामाभिधानावरून 'बागूलांचे बागलाण' असे नाव या भागास पडून ते रूढ झाले , म्हणजेच बागुलांचा (राजांचा) प्रदेश तो बागलाण असे नामाभिधान या भागास प्राप्त झाले.[i] स्वातंत्र्य पूर्व काळातील महत्वाची घटना म्हणजे सारावाढविरोधी आंदोलन होय. यासंबंधी संशोधनात्मक व चिकित्सक विवेचन या शोध निबंधात केलेले आहे .

## सारावाढ विरोधी आंदोलन –

सारावाढविरोधी ऐतिहासिक आंदोलन बागलाणातील स्वात्रंत्य चळवळीतील एक महत्वाची घटना होय . ज्या घटनेन्वये बागलाणला बार्डोलीची उपमा मिळाली . ब्रिटीश राजवटीच्या जुलूमशाही विरोधातील बागलाणातील सतर्क जनतेच्या सहभागातून ही चळवळ झाली.

## गृहीतक -

1. बागलाणच्या ऐतिहासिक वारसासंबंधी विश्लेषण करणे .
2. सारावाढविरोधी ऐतिहासिक आंदोलन ही बागलाणच्या स्वात्रंत्य चळवळीतील महत्वाची घटना होय .

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. संदीप भामरे इतिहास विभाग के.टी.एच. एम. महाविद्यालय, नाशिक.*

**How to cite this article:**
*भामरे, संदीप. (2026). बागलाणातील ऐतिहासिक सारावाढविरोधी जनआंदोलन. Journal of research & development, 18(5(A)), 45–48.* https://doi.org/10.5281/zenodo.20922720

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20922720
OPEN ACCESS

3. सारावाढविरोधी आंदोलनाचे स्वरूप स्पष्ट करणे .
4. सारावाढविरोधी आंदोलनातील जनसहभाग स्पष्ट करणे .
5. बागलाण शेतकरी संघाचे स्वरूप स्पष्ट करणे.

**सारावाढ विरोधी ऐतिहासिक आंदोलनाच्या बागलाणातील सभा -**

ब्रिटिशांच्या जुलमी सारावाढविरोधी आंदोलनाचे लोण बागलाण तालुक्यात पसरले .या आंदोलनासंबंधी लोकजागृती करण्याच्या हेतूने अनेकविध ठिकाणी सभा झाल्या . दि.२१/११/१९२७ रोजी जायखेडा (ता.बागलाण ) या ठिकाणी गोटू गणेश वाणी यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.या सभेत डॉ.भूतेकर , शंकर बाबाजी पोतदार , सजन राघो पाटील आणि डॉ.खाडीलकर यांनी सारावाढ संबंधी विचार मांडले. दि.२८/११/१९२७ रोजी ताहाराबाद येथे सभा झाली. या सभेत डॉ.भूतेकर,मोहिनीराज काथे यांची भाषणे झाली.तसेच महंत सीताराम शास्त्री यांनी अध्यक्षीय समारोप करतांना सारावाढ विरोधी आंदोलनाला प्रेरणा दिली. दि.०५/१२/१९२७ रोजी डांगसौंदाणे येथे सभा झाली नरहर गोपाळशेठ हे या सभेचे अध्यक्ष होते.त्यांनी आपल्या भाषणात सारावाढविरोधी बागलाणातील जनतेच्या प्रक्षोभासंबंधी माहिती सांगितली व पुढील वाटचालीला दिशादर्शकता दर्शविली . तसेच २८/११/१९२८ रोजी मुल्हेर येथे सारावाढविरोधी आंदोलनाची सभा झाली.या सभेत डॉ.भूतेकर आणि सजन राघो पाटील यांची भाषणे झाली.सभेचे अध्यक्ष माधवराव जानोरकर यांनी आंदोलनात सहभागी होण्याविषयी जनतेला अत्यंत कळकळीने आव्हान केले.[ii]

**सरदार वल्लभभाई पटेलांचे मार्गदर्शन ( इ.स.१९२८ )**

बागलाणात सारावाढविरोधी वातावरण तापले होते.याच काळात १८ ऑगष्ट १९२८ रोजी मुंबई इलाखा शेतकरी संघाची एक व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी बागलाणातून नरहर गोपाळशेठ ,शंकर बाबाजी पोतदार ,नारायण सावंत,काळू तानाजी पाटील हे मुंबईला गेले होते.या बैठकीत सारावाढविरोधी आंदोलनासाठी उदभोधित करण्यात आले. या बैठकीत प्रत्येक जिल्ह्यातील एका प्रतिनिधीचे भाषण झाले .बागलाणच्या काळू तानाजी पाटील यांचे भाषण झाले .त्यांनी अहिराणी भाषेतून भाषण केले. या भाषणात ते म्हणाले की , " बागलाण तालुक्यात शेतकरीसनी एकी कयी , तालुकाभर लोकसले तयार कये .खाडीलकर, सीतारामशास्त्री यासनी पुढाकार लिधा त्यासना मांगे मांगे आम्ही गउत म्हणून सरकार मागे हटना. " याप्रसंगी शेवाळे वकिलांनी पाटलांच्या भाषणाचा सारांश इंग्रजीतून सरदार पटेलांना सांगितला.[iii] बागलाणातील प्रतिनिधी शेतकरी संघाच्या बैठकीसाठी गेले होते. बागलाणातील सारावाढविरोधी चळवळीचे आणि जनजागृतीचे कौतुक केले. बागलाणातील सारावाढविरोधी चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. सरदार वल्लभभाई पटेलांनी बागलानातील या चळवळीसाठी प्रेरणा दिली.

**बागलाण शेतकरी संघाची स्थापना ( इ.स. १९२९ )**

मुंबई इलाखा शेतकरी संघाची स्थापना झाल्यावर बागलाणातील कार्यकर्त्यांनी नामपूर येथे एकत्र जमून बागलाण शेतकरी संघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ८ ऑगष्ट १९२९ रोजी नामपूर येथे नरहरशेट यांच्या वाड्यात एक बैठक झाली. मुंबई इलाखा शेतकरी संघाच्या स्थापनेच्यावेळी सरदार पटेलांनी जिल्हा आणि तालुकानिहाय शेतकरी संघाची स्थापना करण्याचे ठरले .

**बागलाण तालुका शेतकरी संघ कार्यकारणी**

चिटणीस – श्री.शंकर बाबाजी पोतदार
अध्यक्ष - श्री. शंकरराव शेवाळे
उपाध्यक्ष - श्री. केशव खुताडे
सदस्य - श्री. गोपाळ पाटील
सदस्य - श्री .सजन राघो पाटील
सदस्य - श्री. संपत सखाराम पाटील
सदस्य - श्री. दामोधर हरी पाठक
सदस्य - श्री. वासुदेव गोविंदराव कुलकर्णी
सदस्य - श्री. काळू तानाजी पाटील
सदस्य - श्री. रामराव कुलकर्णी
सदस्य - श्री. त्र्यबंक भावसार

वरील नियोजनात्मक शेतकरी संघाची सभा स्थापन करून पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली होती.[iv]

**सटाणा येथील सारावाढविरोधी आंदोलनाची सभा ( इ.स.१९२९ )**

सर्वपक्षीय सभेच्या निर्णयानुसार जो मुंबई इलाखा शेतकरी संघ स्थापना झाला होता.त्याची शाखा बागलाणात सुरु करण्याच्या हेतूने महाराष्ट्र प्रांतीक कमिटीतर्फे गोसावी वकील बागलाणात आले.सटाणा येथे शंकरराव शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली सारावाढविरोधी आंदोलनासंबंधी उदबोधन करण्यात आले.[v] बागलाणातील सारावाढविरोधीचा संघर्ष बार्डोलीच्या आंदोलनाशी जोडला गेला. बागलाणातील आंदोलन स्वातंत्र्य आंदोलनाच्या दिशेने विकसित झाले.

**सारावाढविरोधी ऐतिहासिक आंदोलनातील बागलाणच्या स्वातंत्र्य सैनिकांचा सहभाग ;**

ठोके त्र्यंबक फुला (खिरमाणे ता.बागलाण ) यांनी या चळवळीत सहभाग घेतला.त्यांनी या चळवळीसंबंधी आपल्या गावातील जनतेला जागृत केले. भामरे दौलत संपत ( सोमपूर ता.बागलाण ) यांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.त्यांना या सहभागा संबंधी सहा महिने कारावास व रु.१०० / दंडाची शिक्षा झाली .भामरे यांनी सोमपूर गावात या चळवळीविषयी जनजागृती केली. खुटाडे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

नारायण संपत ( नामपूर ता.बागलाण ) यांनी या चळवळीत कृतीशील सहभाग घेतला .या चळवळीसाठी आपल्या गावात उदबोधन केले.त्यासाठी या गावात त्यांनी वैचारिक जागृती केली.या गावात त्यांनी वाचनालय प्रारंभ करून ब्रिटीश राजवटीविषयी असंतोषाला वाचा फोडण्यासाठी अनेक वर्तमानपत्रांच्या अंकाची उपलब्धता करून दिली.विशेष म्हणजे आजही हे वाचनालय अस्तित्वात आहे. भामरे वेडू विठोबा (सोमपूर ता.बागलाण ) यांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला .या चळवळीतील सहभागबाबत त्यांना सहा महिने सश्रम कारावास व रु.५०० दंडाची शिक्षा झाली .पाटील सजन राघो ( टेंभे ता.बागलाण ) यांनी हे आंदोलन टेंभे या गावात अल्पावधीत पसरवले .त्यामुळे या गावात स्वातंत्र्य सैनिकांची फळी स्वातंत्र्य चळवळीला मिळाली. सावंत जयदेव बाबाजी ( नामपूर ता.बागलाण ) यांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. त्यांनी चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.त्यांनी नामपूर येथे या चळवळीसाठी प्रभात फेरी सारखा उपक्रम प्रारंभीत केला.या चळवळीसाठी जनतेला संघटीत केले.[vi] एकूणच सारावाढविरोधी ऐतिहासिक जनआंदोलन हे बागलाणच्या प्रदेशातील स्वातंत्र्यपूर्व काळातील बहुआयामी स्वरुपाचे व स्वातंत्र्यचळवळीसाठी दिशादर्शक असे होते .



**बागलाणातील ऐतिहासिक सारावाढविरोधी जनआंदोलनातील स्वातंत्र्यसेनानी .**



**इ.स.१९२८ मध्ये सारावाढविरुद्ध नामपूर ( बागलाण ) येथे भव्य मिरवणूक निघाली.त्या मिरवणूकीत सहभागी स्वातंत्र्यसेनानी .**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

**निष्कर्ष -**

बागलाण या प्रदेशाला संपन्न ऐतिहासिक वारसा लाभलेला दिसतो . त्यामुळे या प्रदेशाने आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली. सारावाढ विरोधी ऐतिहासिक आंदोलन हे ब्रिटीश कालीन बागलाणच्या राजकीय वाटचालीतील महत्वाची घटना होय . सर्वसामान्यांचा या चळवळीतील सहभाग उल्लेखनीय होता. बागलाणातील या चवळीला सरदार पटेलांनी मार्गदशन केले. म्हणून बागलाणातील सरावाढविरोधी आंदोलन हे जनआंदोलन ठरले

1. Bombay Gazetteer, Nashik Dist.- Vol- XVI 1883 P. -190
2. कापडणीस शं .क .'बागलाण इतिहास दर्शन' परफेक्ट प्रकाशन , सटाणा. 1999 पृ.क्र.
3. Times of India , 25/01/1937
4. Bombay Cronicle , 24/12/1934
5. Confidential Report on Baglan , Committee Report – 03/02/1935
6. स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष – महाराष्ट राज्य - पश्चिम महाराष्ट्र ( नाशिक विभाग ) खंड – १ ,
7. पृ.३९३ – ३९६ .